# मत्स्य महाविद्यालय,शिरगांव,रत्नागिरी
## डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ,
## शिरगांव, ता. जि. रत्नागिरी ४१५ ६२९
**ई—मेल : adfishe.dbskkv@gov.in**


**मत्स्यमहाविद्यालय, शिरगांव, रत्नागिरी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ आयोजित आणि राष्ट्रीय मात्सिकी विकास बोर्ड (NFDB) पुरस्कृत**

**निमखाऱ्या पाण्यातील कोळंबी संवर्धन प्रशिक्षण**

सद्य स्थितीत ''निमखाऱ्या पाण्यातील कोळंबी संवर्धन'' व्यवसायास महत्व प्राप्त झाले असुन यातुन स्वयंरोजगार निर्मितीसाठी मोठा वाव आहे. कोकण तसेच महाराष्ट्र राज्यातील अनेक जिल्हयातून या व्यवसायाची व्याप्ती वाढविण्याची संधी असुन, त्यासाठी प्रशिक्षण मनुष्यबळ निर्माण करण्याची गरज आहे. यासाठी डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ अंतर्गत मत्स्यसंवर्धन विभाग, मत्स्य महाविद्यालय, रत्नागिरी येथे दि. २८.०९.२०२१ ते ३०.०९.२०२१ या कालावधीत एन्एफडीबी पुरस्कृत ''निमखाऱ्या पाण्यातील कोळंबी संवर्धन'' या विषयावर ३ दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम करण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रम एन्एफडीबी च्या नियम आणि अटी नुसार प्रत्यक्ष उपस्थितीसह खालील प्रमाणे आयोजित करण्यात येणार आहे.

१. सदर कार्यक्रम पूर्णतः अनिवासी राहील.
२. प्रशिक्षणार्थींची संख्या ५० पर्यंत सिमीत असून कोव्हीड—१९ च्या मार्गदर्शक तत्वानुसार सामाजिक अंतर, मास्क वापरणे, परिसर निजर्तुकीकरण, इ. बाबी सांभाळून प्रत्यक्ष उपस्थितीसह आयोजित करण्यात येईल.
३. प्रशिक्षणार्थींची निवड ही महाराष्टातील प्रममसंयो (PMMSY) यांचे लाभधारक आणि संभाव्य कोळंबी संवर्धकातून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या प्रमाणे करण्यात येईल.
४. वक्ते तसेच प्रशिक्षणार्थींना आपल्या मोबाईल मध्ये 'आरोग्य सेतू' ॲप डाउनलोड करणे अनिवार्य राहिल.
५. प्रत्येक प्रशिक्षणार्थीने प्रशिक्षण कालावधीत आपल्या निवासाची व्यवस्था स्वतः करावयाची आहे.
६. प्रशिक्षण कार्यकामातील सैंधातिक आणि प्रात्याक्षिक वर्गास उपस्थिती आवश्यक असुन त्यानंतर प्रशिक्षण पुर्ण केल्याबद्दल प्रशस्तिपत्रक प्रदान करण्यात येईल.

या प्रशिक्षण कार्यक्रमात कोळंबी संवर्धनः सध्यस्थिती, भविष्यातील वाटचाल संवर्धन तलाव आराखडा व बांधकाम, कोळंबी बीज निर्मिती तंत्रज्ञान आणि बीज केंद्रे खाद्य व्यवस्थापन, कोळंबी बीज साठवणूकपूर्व तलाव व्यवस्थापन, खाद्य व्यवस्थापन, आद्य जैवके, प्रजैवके, खनिज, उपयोग, कोळंबी आरोग्य व्यवस्थापन, शासनाचे सहकार्य या विषयी विस्तृत माहिती सैंधातिक आणि प्रात्यक्षिक वर्गात देण्यात येईल. या व्यतिरिक्त प्रकल्प भेटीव्दारे जागेची निवड, प्रकल्प रचना कोळंबी संवर्धन व्यवस्थापनयाची माहिती घेता येईल. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या नावनोंदणीसाठी सोबत जोडलेल्या अर्जाव्दारे डॉ. अनिल पावसे ९४२२४३०४९८ व डॉ. सुरेश नाईक ८२७५४५४८२१ मत्स्य संवर्धन विभाग, मत्स्य महाविद्यालय यांच्याशी संपर्क साधावा.

**मत्स्यमहाविद्यालय, शिरगांव, रत्नागिरी, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ आयोजित आणि राष्ट्रीय मात्सिकी विकास बोर्ड (NFDB) पुरस्कृत**

**निमखाऱ्या पाण्यातील कोळंबी संवर्धन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी अर्ज**

| अनिवासी प्रशिक्षण कालावधी :<br>२८/२९/३० सप्टेंबर, २०२१ | | प्रशिक्षण ठिकाण :<br>मत्स्य महाविद्यालय, शिरगांव, रत्नागिरी. | |
|---|---|---|---|
| १) | नाव | | |
| २) | वय | | |
| ३) | लिंग | | |
| ४) | पत्ता | | |
| ५) | भ्रमणध्वनी/दुरध्वनी क्रमांक | | |
| ६) | ई—मेल | | |
| ७) | शिक्षण | | |
| ८) | निमखारे पाण्यातील कोळंबी संवर्धनायोग्य स्वत:ची मालकीची/भाडे पट्टीने घेतलेली जमीन आहे का?<br>• असल्यास किती क्षेत्र आहे?<br>• जागेचा पत्ता | होय / नाही | |
| ९) | शासकीय खाजण जमिनीकरीता अर्ज केला आहे का? :<br>• असल्यास अर्जाचा दिनांक :<br>• मागणी केलेल्या जागेचे ठिकाण :<br>• मागणी केलेल्या जागेचे सर्व्हे नं. : | होय / नाही | |
| १०) | प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजने अंतर्गत निमखारे पाण्यातील कोळंबी संवर्धनासाठी लाभ घेण्यासाठी अर्ज केला आहे का?<br>• असल्यास अर्जाचा दिनांक :<br>• जागेचे ठिकाण :<br>• योजनेचे पूर्ण नाव : | होय / नाही | |
| ११) | प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजने अंतर्गत निमखारे पाण्यातील कोळंबी संवर्धनाचे लाभार्थी आहेत का? | होय / नाही | |
| १२) | वरील अर्जामध्ये देण्यात आलेली माहिती खरी आहे. मी व्यक्तिश: सर्व सत्रांना हजर राहून प्रशिक्षण पूर्ण करेन आणि कोव्हिड—१९ च्या पार्श्वभूमीवर नेमून दिलेल्या नियमांचे पालन करेन. | स्वाक्षरी आणि नाव | |
| | कार्यालयीन उपयोगासाठी: | | |
| | | पात्र / अपात्र | |